# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## अपिल क्रमांक : तक्रार क्र.- ८१५/२०२१

**तक्रारकर्ता,** श्री.बाळाराम हाशा कनकोशे
रा.सुपेगाव, पो.अनगांव, ता.भिवंडी, जि.ठाणे ४२१ ३०२

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय सुपेगांव
ता.भिवंडी, जि.ठाणे

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय सुपेगांव
ता.भिवंडी, जि.ठाणे

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २८.५.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ७.१२.२०२० | ----- | ४.१.२०२१ | ९.३.२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि.२३.४.२०२१ रोजीच्या अर्जान्वये " माहिती देण्यात आली नाही." असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जात त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २८.५.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तथापि, विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. राजेंद्र काशिनाथ बोरसे, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सुपेगाव हे उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

" *(घर नं. ८४ क चा असेसमेंट उतारा मिळणेबाबत.)* "

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

तक्रारकर्ता अनुपस्थित असल्यामुळे तक्रार अर्जावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

या प्रकरणाची थोडक्यात वस्तुस्थिती अशी आहे की, तक्रारकर्ता यांनी जन माहिती अधिकारी, ग्रामपंचायत सुपेगाव यांचेकडे घर नं ८४ क चा असेसमेंट उता-याची प्रत मिळण्यासाठी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत अर्ज केला होता. तथापि, त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपिलिय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, भिवंडी यांचेकडे प्रथम अपिल केले. त्यांनी या अपिलावर दि.९.३.२०२१ रोजी खालीलन्रमपणे आदेश पारित केले.

*"(१) जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना दि.१३.३.२०२१ पूर्वी माहिती विना मोबदला उपलब्ध करून दयावी.*
*(२) जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार २००५ अन्वये कोणतीही कार्यवाही न केलेबाबत दंड लावणे संदर्भात कार्यवाही प्रस्तावित का करणेत येऊ नये याचा लेखी खुलासा या कार्यालयाकडे दि.१३.३.२०२१ पूर्वी करावा.*
*(३) अपिलकार्त यांना दि.१३.३.२०२१ पूर्वी माहिती उपलब्ध न झाल्यास या अर्जावर दि.१५.३.२०२१ रोजी सकाळी पुन्हा ११ वाजता सुनावणी घेण्यात येईल."*

वरीलप्रमाणे आदेशित केल्यानंतरदेखील जन माहिती अधिकारी श्री. जयेश थोरात, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सुपेगाव यांनी माहिती पुरविली नाही. त्यामुळे प्रथम अपिलिय अधिकारी यांनी दि.१५.३.२०२१ रोजी परत सुनावणी घेऊन खालीलप्रमाणे आदेश पारित केले.

"(१) जन माहिती अधिकारी श्री. जयेश थोरात, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सुपेगाव यांना दि.९.३.२०२१ रोजीचे सुनावणीस हजर राहण्याच्या सुचना फोन वरून देणत आल्या होत्या. परंतु जन माहिती अधिकारी श्री. जयेश थोरात हे सुनावणीस गैरहजर राहिले. त्यामुळे दि.९.३.२०२१ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना दि.१३.३.२०२१ रोजी माहिती दयावी व माहिती वेळेत न दिले संदर्भात दंड लावण्याची कार्यवाही का प्रस्तावित करणेत येऊ नये याचा लेखी खुलासा करणेबाबत आदेश पारित केला होता व याची एक प्रत जन माहिती अधिकारी श्री. जयेश थोरात, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सुपेगाव यांचे अधिकृत मोबाईल क्रमांक ७२७६४२४२२१ वर देणेत आली होती. परंतु जन माहिती अधिकारी श्री. जयेश थोरात यांनी या संदर्भात कोणीतीही कार्यवाही केलेली नाही व अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करून दिलेली नाही. सबब, जन माहिती अधिकारी श्री. जयेश थोरात, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सुपेगाव हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७ चे १ व २ ची अंमलबजावणी करीत नाहीत व माहिती देणेस हेतुपुरस्पर टाळाटाळ करीत असल्याचे माझे मत झाले असून मी प्रथम अपिलिय अधिकारी म्हणून पुढीलप्रमाणे आदेश देत अहे.

*(१) " जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.३.२०२१ पूर्वी अपिलकर्ता यांना माहिती मोफत उपलब्ध करून दयावी.*

*(२) जन माहिती अधिकारी श्री. जयेश थोरात, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सुपेगाव, ता. भिवंडी हे माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७ चे १ व २ अन्वये कार्यवाही करणेस कसूर करीत असून कलम व अन्वये शास्ती लादणेस पात्र आहेत.*

*(३) जन माहिती अधिकारी श्री. जयेश थोरात, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सुपेगाव यांचेविरूध्द शास्ती लावणे संदर्भात मा. राज्य माहिती आयुक्त, कोंकण खंडपीठ, कोंकण भवन, बेलापूर यांचेकडे प्रस्तावित करणेत येत आहे."*

प्रथम अपिलिय अधिकारी यांनी अशा प्रकारे आदेश दिल्यानंतरसुध्दा तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. जयेश थोरात, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सुपेगाव यांनी तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करून दिली नाही. आजच्या सुनावणीसही हे जन माहिती अधिकारी सुनावणीची नोटीस मिळूनसुध्दा अनुपस्थित आहेत. प्रथम अपिलिय अधिकारी यांनी अतिशय गंभीर निरिक्षण नोंदविले आहे. त्यांनी माहिती वेळेत न दिल्याबद्दल दंड लावण्याची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याबाबत जन माहिती अधिकारी यांचेकडून खुलासा देखील मागितला होता तो सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी सादर केला नाही. या एकूणच घटनाक्रमावरून जन माहिती अधिकारी हे तक्रारदारांना माहिती देण्यास कसूर करत आहेत हे स्पष्ट होते. त्यामुळे त्यांना शास्ती लावण्याबाबत प्रथम अपिलिय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे. त्यांच्या या प्रस्तावाशी मी सहमत आहे. सबब, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना संपूर्ण माहिती पुढील १ आठवडयाच्या आत विनामूल्य पुरविणे उचित होईल.

तसेच तक्रारकर्ता यांना माहिती देण्यासाठी केलेल्या विलंबाबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. जयेश थोरात, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सुपेगाव यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम २० (१) अन्वये रु.२५,०००/- (अक्षरी रु. पंचवीस हजार फक्त) इतक्या शास्तीची कार्यवाही करणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी आयोग पुढील आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सुपेगाव यांनी **तक्रारकर्ता यांना संपूर्ण माहिती पुढील १ आठवडयात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १ आठवडयात पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. जयेश थोरात, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सुपेगाव यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक ७.१२.२०२० रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपिल आदेशानंतरही माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये रु. २५,०००/- (अक्षरी रु. पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लादण्यात येत आहे.

सदर रक्कम त्यांचे वेतनातून ५ मासिक हप्त्यात वसूल करून लेखाशिर्ष क्र. ००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००-इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६-१) या अर्थसंकल्पीय लेखाशिर्षाखाली

जमा करावी. याबाबतची कार्यवाही करून पूर्तता अहवाल पंचायत समिती कार्यालय, भिवंडी यांनी आयोगास सादर करावा

३. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २८ मे, २०२४

**प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना,**

१. सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई यांचे कार्यालय, १३ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.
२. उप सचिव, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र. ५२७/५२८, कोंकण भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.
३. पंचायत समिती कार्यालय भिवंडी, ता. भिवंडी, जि. ठाणे .
४. आहरण व संवितरण अधिकारी, पंचायत समिती कार्यालय भिवंडी, ता. भिवंडी, जि. ठाणे.
५. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. जयेश थोरात, ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय सुपेगांव, ता.भिवंडी, जि.ठाणे.
**-यांना प्रत** विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय सुपेगांव, ता.भिवंडी, जि.ठाणे **यांचेमार्फत रवाना.**